# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५९ वा ❑ गुरूवार दि.११ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बिबट्यांचा वाढता धोका हा एक गंभीर पर्यावरणीय आणि सामाजिक मुद्दा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

गेल्या काही महिन्यांपासून गावांमध्ये बिबट्यांची घुसखोरी हा लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न बनला आहे. महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यात आता बिबट्यांच्या दहशतीची एक घटना समोर आली आहे. बिबट्यांच्या दहशतीमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एका बिबट्याने पुन्हा एकदा एका लहान मुलीचा बळी घेतला आहे. वडिलांसोबत शेतात गेलेल्या एका लहान मुलीवर बिबट्याने हल्ला केला. गोंदियातील तिरोडा तालुक्यातील इंदोरा निमगाव येथे ही घटना घडली. बिबट्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मुलीला गोंदियातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु रात्री उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

भारतातील अनेक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र (पुणे, नाशिक, गोंदिया) आणि उत्तर प्रदेश (मुझफ्फरनगर, बहराइच) बिबट्यांचा वाढता धोका ही एक गंभीर समस्या बनली आहे. बिबट्यांचा वाढता धोका हा एक गंभीर पर्यावरणीय आणि सामाजिक मुद्दा आहे ज्यासाठी जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी आणि मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी वन विभाग, प्रशासन आणि स्थानिक समुदायांमध्ये समन्वय आणि प्रभावी उपाययोजना आवश्यक आहेत.

उसाच्या शेतात आणि शहरी-ग्रामीण भागात बिबट्यांच्या घुसखोरीमुळे असंख्य मृत्यू आणि हल्ले झाले आहेत, विशेषतः मुलांचे. यामुळे गावकऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे आणि वन विभागावर दबाव वाढला आहे. लोक काठ्या आणि घंटा घेऊन गटांमध्ये शेतात प्रवेश करत आहेत. वन विभाग पिंजरे बसवून आणि गस्त घालून परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असताना, संघर्ष सुरूच आहे आणि ग्रामस्थांनी स्वतः पाळत ठेवण्याची जबाबदारी घेतली आहे.

दोन महिन्यांत जुन्नर आणि शिरूरमध्ये १४ जणांचा मृत्यू; ११ जखमी, नाशिकमध्ये दोघांचा मृत्यू; गोंदियातील शेतात एका मुलीचा मृत्यू; ऊस लागवडीमुळे अधिवासांवर अतिक्रमण वाढले आहे.

तामिळनाडू मध्ये (कोइम्बतूर): गेल्या आठ महिन्यांत ३ मुलांचा मृत्यू; झाल्याने परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेश (मुझफ्फरनगर, बहराइच) मध्ये गावकरी वन विभागासोबत मिळून ड्रोन वापरून शोध मोहीम राबवत आहेत.

शेतकरी त्यांच्या शेतात एकटे जाण्यास घाबरत आहेत; रात्री गाडी चालवणाऱ्या शेतकऱ्यांना लक्ष्य केले जात आहे; गावकरी काठ्या आणि घंटा घेऊन स्वतःचे रक्षण करत आहेत.

बिबट्याला पकडून दूरच्या जंगलात सोडण्याचे, पिंजरे लावण्याचे आणि जनजागृती करण्याचे प्रयत्न वनविभागाकडून सुरू आहेत.एकटे प्रवास टाळण्याचे, गटात राहण्याचे आणि वन विभागाला माहिती देण्याचे आवाहन; काही ठिकाणी गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे.ड्रोन पाळत ठेवणे आणि गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.

बिबट्यांसाठी शाश्वत शिकार आधार प्रदान करण्यासाठी खूर असलेल्या प्राण्यांसाठी व्यवस्थापन कार्यक्रम विकसित आणि अंमलात आणायला पाहिजे. शिकार भाडेपट्ट्यांचे क्षेत्रीकरण करून, कुत्र्यांसह शिकार करण्यास आणि बिबट्यांच्या अधिवासात सापळ्यांचा वापर करण्यास बंदी घालता येईल. टुमेनेट प्रकल्पासह बिबट्या संवर्धनावर समन्वित पर्यावरणीय शिक्षण कार्यक्रम आयोजित करता येईल.

अधिवासाचा नाश आणि शिकार, तसेच पशुधन हत्याकांड म्हणून होणारा तीव्र छळ हे या भव्य मोठ्या मांजरीसाठी मुख्य धोके आहेत. दक्षिण आशियामध्ये त्यांची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते कारण त्यांची कातडी आणि हाडे चिनी औषधी व्यापाराला पुरवतात. पश्चिम आणि मध्य आफ्रिकेत, त्यांची फर, दात आणि नखांसाठी त्यांची शिकार केली जाते.

# समाजाच्या आरोग्यासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्न प्रशंसनीय - प्रकाश अबिटकर

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – आरोग्य मंत्री श्री. प्रकाश अबिटकर यांच्या अलीकडील छत्रपती संभाजीनगर भेटीदरम्यान आय एम ए महिला डॉक्टर्स विंगतर्फे ''जागर स्त्री शक्तीचा'' उपक्रमाचा अहवाल सादर करण्यात आला. इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेने गेल्या काही महिन्यांत विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवून समाजाभिमुख कार्याला गती दिली.

या उपक्रमांत कर्करोग जनजागृती, शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वप्रेरणा सत्रे, आपत्कालीन प्रतिसाद प्रशिक्षण, कार्डिओ पल्मनरी रिसक्सीटेशन (सीपीआर) मार्गदर्शन, महापालिकेतील महिला सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य



तपासणी शिबिर, पुरग्रस्त नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबिर, तसेच गर्भाशय मुखाच्या कर्करोग प्रतिबंध व लसीकरण जागरुकता मोहीम यांचा समावेश होता.

मुख्य समन्वयक डॉ. आसावरी टाकळकर यांच्या नियोजनामुळे हे सर्व कार्यक्रम प्रभावीपणे राबविले गेले.

महिला डॉक्टरांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शहरात आरोग्यजागर आणि प्रतिबंधात्मक आरोग्याचा सकारात्मक संदेश पोहोचला.

आरोग्य मंत्री श्री. प्रकाश अबिटकर यांनी महिला डॉक्टर्स विंगचे कौतुक केले. समाजाच्या आरोग्यासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना त्यांनी प्रशंसनीय असे म्हटले. त्यांनी महिला डॉक्टर्सच्या सामाजिक बांधिलकीचेही अभिनंदन केले.

या उपक्रमामुळे महिलांच्या आरोग्याची जाणीव वाढली आणि विविध स्तरांवर आरोग्यविषयक सजगता निर्माण झाली. आय एम ए छत्रपती संभाजीनगर शाखेचे सर्व सदस्य या कार्यात उत्साहाने सहभागी झाले.

मुख्य समन्वयक: डॉ. आसावरी टाकळकर

अध्यक्ष: डॉ. अनुपम टाकळकर

सचिव: डॉ. योगेश लक्कस. जागर स्त्री शक्तीचा समन्वयक आणि टीम सदस्य – डॉ. अर्चना भांडेकर, डॉ. सोनाली सावजी, डॉ. दीपांजली देशमुख, डॉ अंजली गाडे, डॉ वैशाली सुरवसे, डॉ. उर्मिला चाकुरकर, डॉ. अपर्णा राऊळ, डॉ. अनघा दिवाण, डॉ. श्वेता मंत्रि, डॉ. कुंदा धुळे, डॉ. मंजुषा खंडागळे, डॉ. गीतेश दळवी, डॉ. प्रतिमा भाले, डॉ. परिक्षित सातपुते, डॉ. लीना सोनी, डॉ. इशरत बारूदवाला, डॉ. अश्विनी सिंगू, डॉ. रश्मी बोरिकर, डॉ. रश्मी दळवी, डॉ. वैदेही गुनाले बेंबडे, डॉ. राठोडकर.

छत्रपती संभाजीनगर शाखेचा ''जागर स्त्री शक्तीचा'' उपक्रम समाजासाठी आरोग्य व जागरुकतेचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

# शांतता.... पुणेकर वाचत आहे ! चळवळ व्यापक व्हावी

ज्योतिर्मय साहित्य




गेल्या वर्षी पुण्यामध्ये पुस्तक महोत्सव साजरा करण्यात आला या आधीही दोन वर्ष पुण्यामध्ये पुस्तक महोत्सव साजरा झाला.हे तिसरे वर्ष आहे. लाखाचे वर वाचकांनी त्याला भेट दिली आणि काही कोटींमध्ये पुस्तकांची विक्री झाल्याचे चे वृत्त आपण वाचले होते. होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये असंख्य रसिकांनी हजेरी दिली. जवळपास ४०० ५०० पुस्तकांची स्टॉल होती. लहान मुलांसाठी स्वतंत्र विभाग होता. आता यावर्षीही या तारखांना पुण्यामध्ये गरवारे कॉलेजच्या पटांगणावर १३ ते २१ डिसेंबर कालावधीत पुस्तक महोत्सव होणार आहे. आता यावर्षी पुस्तकाचे स्ट्राँल वाढणार आहेत.

पुणे मुंबई नागपूर अशा ठिकाणी पुस्तक महोत्सव होतीलच पण या व्यतिरिक्त महाराष्ट्रात असंख्य ठिकाणी असे पुस्तक महोत्सव व्हायला हवेत. थोडक्यात वाचकांचे जवळ किंवा समोर पुस्तक जायला हवीत हा या मागचा महत्त्वाचा उद्देश आहे. अर्थातच निरनिराळ्या विषयावरील, आकर्षक मुखपृष्ठ असलेली असंख्य पुस्तके बघितल्यानंतर वाचकांना त्यातून निवडून काहीतरी घ्यावीशी वाटतातच. वाचावीशी वाटतात.




अशा पुस्तक महोत्सवाने पुणे मुंबई नागपूर अशा ठिकाणची वातावरण तर पुस्तकांमुळे ढवळून निघतेच परंतु आता ही पुस्तक महोत्सवाची चळवळ संपूर्ण महाराष्ट्रभर पसरायला हवी आहे. दरवर्षी या ठिकाणी असे महोत्सव साजरी करताना त्याचबरोबर इतर जिल्हे आणि त्याचबरोबर तालुका पातळीपर्यंत असे महोत्सव आयोजित करायला हवे. जर आपल्याला वाचन संस्कृती रुजवायची आहे,टिकवायची आहे तर फक्त एवढा संकुचित विचार करून भागणार नाही त्यात व्यापकता यायला हवी. परवाच नागपूर येथे पुस्तक महोत्सवात राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी असे मत व्यक्त केले की आता पुस्तक महोत्सवाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे आणि ती तालुका पातळी पर्यंत नेण्याचा आमचा विचार आहे. तर हे कृतीत उतरायला हवे. अजूनही तालुका पातळीवर पुस्तकाची दुकाने नाहीत असतील तर अगदी अपवादात्मक म्हणावी लागेल.

त्याचबरोबर मला असे वाटले, शांतता ! पुणेकर पुस्तक वाचत आहे.. असे आवाहन न करता,शांतता ! महाराष्ट्र पुस्तक वाचतोय. असे करायला हवे. असा दिवस ठरवताना तो सुट्टीचा दिवस असावा, कारण कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन तसेच शाळा कॉलेज अशा ठिकाणचे वाचक त्यात सहभागी होऊ शकणार नाहीत. आणि खरंतर वर्षभरातून तोही एक तास वाचनाचा ही कल्पना काही योग्य वाटत नाही. अहो ! तुम्ही सुट्टीच्या दिवशी साधारणपणे कितीतरी वेळ बाहेर शॉपिंगला घालवतात, हॉटेलमध्ये घालवतात, आणि मोबाईल मध्ये घालवता. साधारणपणे हा वेळ दोन तीन तासाच्या पुढेच असतो. मग मी तर म्हणेल की दर महिन्याला एका सुट्टीच्या दिवशी किमान दोन ते तीन तास वाचण्यात घालवावे किंवा महिनाभरात किमान एक पुस्तक तरी वाचण्याचा निश्चय करावा तरच काही साध्य होईल. अन्यथा आम्ही काहीतरी वाचतो याचं कौतुक आणि गवगवा निरर्थक. निरर्थक चर्चा जास्त होते.

राज्य साहित्य संस्कृती महामंडळ,अ.भा. साहित्य महामंडळ, मराठी साहित्य परिषद, विदर्भ मराठवाडा साहित्य परिषद, मराठी भाषा विभाग आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास अर्थातच नॅशनल बुक ट्रस्ट यांनी संयुक्त रित्या व्यापकपणे चळवळ राबवून वाचन संस्कृती वाढवण्याचा प्रयत्न करायला हवा. शालेय शिक्षण मंत्री उच्च शिक्षण मंत्री यांनी याबाबतीत पुढाकार घ्यायला हवा.शाळा, काँलेजेस,मधून संस्कार होतील अशा पुस्तकांची ओळख करून द्यायला हवी.

ग्रंथाली वाचक चळवळीने( दिनकर गांगल. अरुण साधू.कुमार केतकर.) अशाच प्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी ५० ठिकाणी ५० शहरात एकाच दिवशी पुस्तक प्रदर्शन आणि साहित्यिक कार्यक्रम ''ग्रंथ मोहोळ'' राबवण्याचा उपक्रम काही वर्षांपूर्वी केला होता. त्याला सर्व दूर फार मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला होता. तुर्त एवढेच.

***






## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-११३



*ह्या लघुलेखात आपण "चंदेरी" रंगाची माहिती घेणार आहोत. चमकदार, हलका आणि आकर्षक दिसणारा हा रंग भारतीय पारंपारिक वस्त्रांमध्ये, विशेषत: चंदेरी साड्यांमध्ये वापरला जातो. या रंगात पिवळसर आणि पांढरट छटा दिसते.*

*हा रंग "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये फार क्वचित वापरला जातो. पण त्याचा सकारात्मक परिणामही तितकाच 'एकमेव' ठरणारा असतो.*

*चंदेरी रंगाची वैशिष्ठ्ये जर आपण पाहिली तर आपल्या ध्यानात येईल की चंदेरी रंगाचा पारंपारिक महत्त्वाचा रंग, म्हणून वापर होतो.हाच रंग अनेकदा पिवळ्या, गुलाबी, हिरव्या आणि राखाडी रंगांच्या छटा मध्येही दिसतो; आधुनिक डिझाइन्स, मध्येही हा रंग यथायोग्य प्रमाणात वापरतात आणि चमकदार पोत असल्यामुळे हा रंग खूप सुंदर दिसतो.*

*ह्या रंगाचा, वस्त्र डिझाईन्स मध्ये मोठ्या प्रमाणात वापर कम जातो. खूप धर्मामध्ये या रंगाचं धार्मिक महत्व देखील आहे. धार्मिक दृष्ट्या शुध्दता,शांती, दैवी शक्ती आाणि समृध्दीचे प्रतीक म्हणून मानले जाते.बौद्ध धर्मात पांढऱ्या रंगा सोबत चंदेरी रंग आत्मिक शुद्धता दर्शवतो. अनेकदा हा रंग चंद्राशी, देवतांशी ज़ोडेलेला असतो. पूजेमध्ये, शुभ प्रसंगात तो वैभव आणि पावित्र्य दर्शवतो. चंदेरी, चांदी,चंद्र हे सर्वच शब्द प्रेम,प्रेमकथा ,प्रेमी युगुल,*


*प्रेमभावना यांच्याशी संबंधित आहेत. चंद हा मनाचा कारक आहे. मनाचा रंग चंदेरी असतो. चंदेरी रंगाच्या विनियोगा मुळे मनावर सकारात्मक परिणाम होतो. चंदेरी रंग हा अलंकारांना, अलंकृत करण्यासाठी, "मीनाकाम" करणाऱ्या कारागीरांना, फार उपयोगी पडतो.*

*चंदेरी रंगाच्या उपयोगामुळे रंग संकल्पनात एक वेगळेपण प्रतीत होते. स्मृतिप्रवणता वृद्धीस लागते, जेव्हा (एखाद्या "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये आवश्यकते नुसार चंदेरी रंग वापरला जातो, तेव्हा हजारे पेटींग मधून असे पेंटींग एखादेच असते.उपभोक्त्याची चांदीच होते. असे अनुभव घेणारे सांगतात...!!*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

जाईन माहेरा
राहीन रातभर,
गोतावळा गोड
मुखी सांडली साखर ||३८९||

माहेराला जाता
बाया ईचारे खुशाली
तु त हातची- मातची
अशी काहून सुकली? ||३९०||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## माती भिडली आभाळा...




ज्योतिर्मय साहित्य


पैठणहून आळंदीला जाताना ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाईंनी या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. असे म्हणतात की पैठणला ज्या रेड्याकडून ज्ञानेश्वर माऊलींनी वेद वदवून घेतले, तो रेडा देखील या ठिकाणी त्यांच्या सोबत होता. इथेच निवृत्तीनाथांनी ज्ञानोबा माऊलींना ज्ञानेश्वरी लिहिण्याची आज्ञा दिली. इथेच त्यांना तसे का वाटावं ? तर या स्थानाचा महिमाच तसा होता. या ठिकाणी साक्षात श्री विष्णूंनी मोहिनीरूपात दहा दिवस निवास केला होता. त्यांनी निवास केला म्हणून हे नेवासे असे म्हटले जाते. त्या मोहिनीराजांचं सुंदर हेमाडपंती मंदिर इथे आहे.




समुद्रमंथनातून जेव्हा चौदा रत्ने बाहेर पडली, तेव्हा त्यात अमृताचा कलश हाती घेऊन धन्वंतरी प्रकट झाले. अमृत हे अमरत्व प्रदान करणारे होते. म्हणून देव आणि दानव यांच्यात अमृत वाटपावरून भांडणे सुरु झाली. त्यात भगवान विष्णूंनी मोहिनीरूप धारण करून देवांना अमृत आणि दानवांना सुरा म्हणजे मदिरा वाटप केली. हे राहू आणि केतूच्या लक्षात आले. राहू अमृत प्राशन करण्यासाठी आपले रूप बदलून देवांमध्ये जाऊन बसला. श्री विष्णूंच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या सुदर्शन चक्राच्या साहाय्याने राहुचा शिरच्छेद केला. त्याचे शीर उडून ज्या ठिकाणी पडले त्या गावाला राहुरी असे नाव प्राप्त झाले तर त्याचा देह म्हणजे काया ज्या ठिकाणी पडली, ते कायगाव म्हणून प्रसिद्ध झाले अशी दंतकथा आहे.

तात्पर्य हे इतके पवित्र ठिकाण आहे. इथे एकदा श्री विष्णूंनी अमृत वाटप केले. दुसऱ्यांदा ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या रूपात साऱ्या जगाला अमृत प्रदान केले. ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी सारस्वताचे सौभाग्यलेणे. काव्य आणि तत्वज्ञान यांचा सुरेख संगम. यानंतर त्याठिकाणी अमृतासमान अनुभव देणारा अमृतानुभव हा ग्रंथ ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिला. ज्या प्रवरा नदीच्या काठावर हे तीर्थक्षेत्र वसले आहे, त्या प्रवरेला अमृतवाहिनी असे संबोधले जाते. येथून जवळच गोदावरी आणि प्रवरेचा संगम आहे. या संगमावर देवगड हे पवित्र स्थान आहे. जवळच शनी शिंगणापूर आहे. असा हा रम्य आणि पवित्र परिसर. या पवित्र, शांत आणि रम्य स्थळी खरोखरच वेळ काढून जायलाच हवं.

***




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## द्रुष्यनिरसन

ज्योतिर्मय साहित्य


जे जे खरें नाही ते ते खरें पणाने मानले तर मग खऱ्या खोट्याची परिक्षा करण्यास जाणत्याची गरजचं उरत नाही. परंतु अविद्या आली की तिच्या प्रभावाने असे प्रकार घडतात. एखादा जादूगार जेव्हा जादूचे खेळ करतो तेव्हा त्याने त्याच्या पोतडीतुन काढलेल्या सगळ्या वस्तू ख-या वाटतात. पण एकदा का जादूचा प्रयोग संपला की तो जादूगार आपल्याला सर्व कसे खोटे होते ही दाखवतो.

राक्षस सुध्दा अशीच खोटी माया दाखवून देतात व तिथे देवही फसतात.वाचक मित्रांनो तुम्ही म्हणाल की देवाला कसे काय फसवता येते . नाशिक मध्ये पंचवटीत हरणाचं रूप घेऊन आलेलं हरीण!त्या खोट्या हरणाला भुलून श्रीरामाने त्याचा पाठलाग केला हे तर आपल्याला माहिती आहेच.राक्षस मायेने आपले शरीर बदलतात, एक राक्षस मायेने पुष्कळ राक्षस तयार करतात .युद्धामध्ये रक्ताच्या थेंबातुन नवीन राक्षस तयार होतात. अनेक वस्तु व फळे यांची रूपे घेऊन राक्षस द्वारकेत शिरले अशा कपटी राक्षसांना भगवान श्रीकृष्णाने ठार मारले. आपल्याला माहिती आहे की रावणाने कपटी पणाने रामाचे खोटे शिर तयार केले ते सीतेला दाखवले. त्या प्रमाणे ‘‘काळनेमी‘‘ने मायेने केलेला आश्रम किती विलक्षण व अपूर्व होता. द्रोणागिरी नेताना मारूतीला फसवून उशीर करण्यासाठी काळनेमीने ऋषीचे सोंग घेतले आणि एक सुंदर आश्रम निर्माण करून तिथे खोटा ध्यानस्थ बसला, मारूती प्रथम फसला पण नंतर ते कपट ओळखून मारुतीने‘‘ काळेनेमीस‘‘ ठार मारले.

आपण समासाच्या समारोपाकडे आलो आहोत. आता पर्यन्त आपण अभ्यासले की डोळ्याला जे जे दिसते ते ते सगळे खरे असतेच असे नाही। त्यासाठी समर्थांनी आरशाची जादुगाराची ,पाण्याच्या बुडबुड्याची अशी कितीतरी ऊदा दिली आहेत. आणि ती तंतोतंत खरी आहेत.

माया खरी मानावी म्हटले तर ती प्रत्यक्ष नाश पावते. माया खोटी मानावी तर ती प्रत्यक्ष दिसते. म्हणून माया खरी आहे असे सांगितले तर मन विश्वास ठेवत नाही. तसेच माया खोटी आहे असे सांगितले तरीही मन विश्वास ठेवायला तयार होत नाही. म्हणजेच मायेचा विचार म्हणजे खोट्याचा विचार आहे. आणि मायेचा हा जो काही पसारा आहे तो स्वप्नासारखा आहे असे समजा. माणसाच्या विचारामध्ये ही जीगुंतागुंत होते याचे कारण म्हणजे अविद्या होय. अविद्येतुन ‘‘मी देहचं आहे‘‘ ही देहबुद्धी म्हणजेच अहंकार जन्माला येतो. या अहंकारी स्वभावामुळे परमेश्वरा पर्यन्त पोहचता येत नाही. कारण देवाला सत्वगुणी लोकचं आवडतात. आपला जन्म अविद्येतच होतो. आतबाहेर सगळीकडे द्रुष्याचा मायावी पसारा येवढा वाढला आहे की मिथ्या असलेले द्र्युष्य **(क्रमशः)**

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दु:ख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दु:ख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

मित्रांनो या लेखात आपण कृष्णतत्वज्ञान समजून घेणार आहोत.

तोचि जाणिवेचा जरी उदयो होये
तरी मुद्दल वेधुन मीचि आहे
आणि तो विधानातें जया विये
तो क्रतुही मीचि
मग तया कर्मापासूनि बरवा
जो सांगोपांगु आघवा
यज्ञु प्रगटे पांडवा तो ही मी गा
स्वाहा मी स्वधा सोमादि औषधी विविधा
आज्य मी समिधा मंत्रु मी हवि ।।
होता मी हवन कीजे तेथ अग्नी तो स्वरूप माझें ।
आणिक सुतक वस्तु जें जें । ते ही मीचि

ज्ञानाचा उदय झाला असतां, मुख्य वेद मींच आहे.

त्यात विविध अनुष्ठाने जे जे सांगितले आहे तो ऋतुही मींच!, करण्यापासून प्रगट होणारा जो यथाविधि यज्ञ तोही मीच आहे.

देवांस हवि
देण्याचा मंत्र मी!!,

हा लेख लिहायला घेतला आणि आठवले की काल पासून म्हणजे दिनांक ७/९/२०२५

पासून पक्षपंधरवडा सुरु झाला आहे. तुम्ही आपापल्या पितरांना तृप्त करत आहात. आणि हा लेख लिहिताना हा प्रत्यक्ष दाखला मिळणे ही कृष्णलिला आहे असे समजायचे का !!

पितरांना हवी देण्याचा मंत्र मी!!, ऋत्विज मी,ज्यात हवन करायचें तो अग्निहि मी,

घृत मी, समिधा मी, मंत्र मी, होम द्रव्य मी, ज्यांत हवन करायचें तो अग्निहि माझेचं रूप आहे. आणि अग्नित ज्या ज्या वस्तु अर्पण करायच्या त्या त्या मीच आहे.

ज्यांच्या बहुषृत पणाने अष्टांग प्रकृति ही जगास प्रसवते, तो जगत्पिता मी!!

अर्धनारी नंटेश्वर स्वरूपांत ज्याप्रमाणे पुरूष तोच स्त्री व स्त्री तोच पुरूष असतो, त्याप्रमाणे स्थावर जंगमाची माताहि मी, आणि उत्पन्न झालेले जगही ज्या ठिकाणी राहतें व ज्या योगाने प्राणी मात्रांचे रक्षण करत ते माझ्याशिवाय दुसरे कोणी नाही. प्रकृति व पुरूष ही दोन्हीं ज्याच्या अंत:करणात म्हणजे निर्गुण रूपात उत्पन्न होतात तो हा त्रिभुवन किर्तिचा विश्वनाथ मीं!!. सर्व ज्ञानाच्या वाटा ज्या गावात जाऊन मिळतात व चारी वेदांच्या रूपात मी++

वेदो वैद्य सदायोगी विरहा माधवो मधू ।।

तो वैद्य मी होय.

ज्या ठिकाणी पुष्कळ प्रकारची मते व मतमतांतरे झाली ; अनेक शास्त्रांची एकमेकांशी ओळख झाली अशा ज्ञानशाखांचा मानवी जीवनात यशस्वी होण्यासाठी मदत होईल तिथे माझे अस्तित्व असेल. त्या पवित्र स्थानात माझे अस्तित्व असेल.

ब्रम्हबीजाला परा, पश्चंती, मध्यमा आणि वैखरी या चार शाखा म्हणजे मी !!

इवलेसे रोप हेच अंकुर फुटल्यावर त्यांचे वृक्षात रूपांतर होते. त्या लतावेली झाडे, त्या झाडाची मधूरफळे तृप्ती देतात, पांथस्थाला विसावा देतात.

पाथरवट दगडाला देवपण देतो मंदिरात प्रतिष्ठापना करतात व ज्या मंदिरात जो कायम स्वरूपी विराजमान आहे तो मूळबीज म्हणजे ऊँ कार

**(क्रमशः)**

## ॥ समृद्ध मराठवाडा ॥

माधव सूर्यवंशी,
माकणीकर
(मो. 9527853953)



ज्योतिर्मय साहित्य

बाराव्या शतकादरम्यान देवगिरीचे राजा रामदेवराय यांचे साम्राज्य भरभराटीला होते. इस ८५० दरम्यान यादव साम्राज्य उदयाला आलं ते इस १३३४ पर्यंत होतं. यादवांनी संस्कृतीला प्राधान्य दिले. भगवान श्रीकृष्णाच्या यादव वंशातील यादव घराण्यातील भिल्लमदेव यादव देवगिरी येथे यादव साम्राज्याची स्थापना केली. यादव साम्राज्यातील सिंधनदेव हा राजा अत्यंत पराक्रमी होता. शिंगणापूर येथील महादेव मंदिर त्यांनी बांधले म्हणून सिंघनदेव या नावावरुन त्यास शिंगणापूर असे नांवे पडले. त्यांच्या पराक्रमाने यादव साम्राज्य मोठया भागावर पसरले होते. हेमाडपंथी नावाचे शिवमंदिर ज्या ज्या भागात आढळतात तो सर्व प्रांत यादव साम्राज्याचा होता. त्यांनी मराठी भाषेला प्राधान्य दिले. मराठी भाषेला राजाश्रय दिला. पहिले मराठी राज्य मानले जाते. हेमाडपंथी मंदिरासोबतच बारव विहीरी त्यांच्या राज्याची देण आहेत असे मानले जाते. मोडी ही जरी लिखाणाची लिपी असली तरी ती प्राकृत मराठी भाषेची लिपी होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोतोश्री जिजाबाईचे माहेर सिंदखेड राजा येथील जाधव घराण्याचे मुळ देवगिरीच्या यादव घराण्यामध्येच आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मुळ स्थान मराठवाडयातील वेरुळ येथील. वेरुळ म्हणजे भोसले घराण्याचे मुळ ठिकाण. बाबाजी भोसले यांची वेरुळ आणि आसपासच्या गावामध्ये पाटीलकी होती. त्यामुळे मराठवाडयास छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेला आहे. बाबाजी भोसले यांचे पुत्र मालोजी राजे, मालोजी राजे यांचे पुत्र शहाजी महाराज आणि शहाजी महाराज यांचे पुत्र छत्रपती शिवाजी महाराज अशी महाराजांची वंशावळ आहे. विशेष म्हणजे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज असलेल्या जाधव घराण्यातील जितामाता आणि वेरुळ येथील भोसले घराण्यातील शहाजी महाराज यांचा विवाह सन १६०५ मध्ये दौलताबाद येथील देवगिरी किल्ल्यावर झाला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मागच्या पिढया हा मराठवाडयाचाच भाग आहेत. पुढे वेगवेगळया शासन काळामध्ये स्थलांतर होत महाराजांचे कार्यक्षेत्र पुणे, कोकण पासून सुरुवात होऊन नंतरच्या काळात महाराष्ट्रासह संपूर्ण दक्षिण भारत व्यापले होते. तद्नंतरच्या काळात महाराजांची स्थापन केलेल्या मराठी साम्राज्यात मराठी मुलुखांखाली संपूर्ण देश आला होता.

**(क्रमशः)**




## दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

खुप काम आहे, असे म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकते. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकता तसेच कार्यक्षमतेवर देखील वाईट परिणाम होऊ शकतो काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळात पण आरोग्यासाठी हे घातक आहे. हे आहेत दुष्परिणाम.

चक्कर येणे.

भुकेले राहिल्याने अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

ताण-तणाव.

भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

लठ्ठपणा वाढतो.

भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केल्यास, वेळी-अवेळी खाल्लास, वजन वाढते, म्हणजे लठ्ठपणा वाढतो... वेळेत जेवण न केल्याने चयापचय प्रक्रिया बिघडते व फॅट्स शरीरात जमा होतात, यामुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. तेव्हा वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तरं, भूक लागेल तेव्हा वेळेवर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि किमान २० मिनिटे व्यायाम करा...

मेंदूचे कार्य बिघडते.

ग्लुकोजच्या मदतीने मेंदूचे कार्य सुरू असते. यासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी खालावते. लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता कमी होते.

चिडचिड.

भुकेमुळे जास्त चिडचिड होते. रक्तातील साखरेची पातळी खालावल्याने मेंदूप्रमाणे तुमच्या मूडवर याचा परिणाम होतो...

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# नांदेड सिटीमध्ये श्रीमद् भगवत गीता पठण सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – संपूर्ण श्रीमद् भगवद् गीता पठण सोहळा , नांदेड सिटीतील श्री रामचंद्र मिशनच्या हार्टफुलनेस ध्यान केंद्राच्या सुसज्ज मेडिटेशन हॉलमध्ये पार पडला गीता जयंतीचे औचित्य साधून सर्वगुणसंपन्न व सेवा सिटी नांदेड सिटी मध्ये रविवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी सामूहिक संपूर्ण भगवद् गीता पठण सोहळा सुमारे २०० बंधू भगिनींच्या उपस्थितीत उत्साहाने साजरा झाला.

नांदेड गाव तसेच नांदेड सिटी तील १४ सोसायट्यां मधील गीताध्यायी जनांचे एकत्रिकरण करून अशा या सुंदर सामुहिक गीता पठणाचा कार्यक्रम, भारतीय स्त्री शक्ती, नांदेड सिटी, गीता पठण समिती व नांदेड सिटी सेवा समूह तर्फे आयोजित केला होता. श्रीमती संध्या पिंजन यांनी, कार्यक्रमस्थळी स्वागताची सुंदर रांगोळी काढली होती. या शिवाय कार्यक्रमाचे वेळीही अनेकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली. भगवान श्रीकृष्णांची सुंदर सुबक रेखीव मूर्ती , समई, दीपक यांचे सुवासिक सुवर्ण चाफ्याच्या फ ुलांनी मान्यवरांच्या हस्ते पूजनझाले .

नांदेड सिटीतील ज्येष्ठ गीता–शिक्षिका . सौ जयश्री खंडेपारकर, रामचंद्र मिशनचे विजयराव इंगवले, ब्रह्मकुमारी ललितादीदी सुधीर काळकर, कु रागीणी इ. मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन व पूजन झाले. स्टेजवर संपूर्ण गीता कंठस्थ साठी शृंगेरी शंकराचार्यांचा आशीर्वाद लाभलेल्या आरतीताई कुलकर्णी, मीनाक्षी गायकवाड, गौरी ढुमके, सुरेखा बेंडे, शशिरेखा परांजपे या माइकवरून सुस्पष्ट व लयबद्ध पठण करीत होत्या . त्यांच लयीत सर्वांनी सुरेख सामुहिक पठण केले ॐ नमो भगवते वासुदेवाय हा मंत्रजप, गीता प्रार्थना, गीता अध्याय १ ते १८ संपूर्ण पठण, गीता महात्म्य, ''घरोघरी गीता जाउ दे'' हे गीत व गीतेची आरती अशा अनुक्रमाने पठण झाले. आरतीचे वेळी डॉ श्री व सौ बर्डे, चित्राताई देशपांडे, प्रकाश गोरे,



भरतभाऊ वांजळे इत्यादी व सर्व पाठक उपस्थित होते. कार्यक्रमाचे शेवटी बुंदी प्रसाद व पुलाव पॅकेट्स देण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे, कार्यक्रम ठरल्याप्रमाणे वेळेत सुरु झाला व १.३० वाजता संपन्न झाला. पूर्व सूचनेनुसार सर्वांनी मंगल वेष धारण केला होता. गीता मुखोद्गत असलेल्यांनी केशरी व इतर सर्वांनी पांढरी मोतिया रंगाची वस्त्रे परिधान केली होती. स्वागत क्षातून येताना स्वयंसेवकांनी सर्वांना गंध नाम टिळा व अत्तर लावून स्वागत केले. गीता प्रेसची संपूर्ण गीता पठण पुस्तके वाचन तथा स्वागत मूल्यासहित उपलब्ध केलेली होती . सर्वांसाठी खुर्च्यांची आसनव्यवस्था होती.

कार्यक्रमाचे नियोजन अतिशय आखीव रेखीव आणि शिस्तबद्ध होते सर्व सदस्यांना दिलेल्या सूचना एकदम स्वच्छ आणि निःसंदेह होत्या.बहुसंख्य महिला जेष्ठ नागरिक असूनही वेळेचे नियोजन अप्रतिम होते .शिस्त, स्वच्छता व शांतता या त्रिसूत्रीचे सर्वांनी आनंदाने पालन केले. या सारख्या कार्यक्रमातून भाविकांना नवी उभारी मिळते ,यातून मिळणारी ऊर्जा दीर्घकाळ टिकते संपूर्ण मानवजातीला गीतेचे तत्वज्ञान ही भारतीय संस्कृतीची एक अनमोल देणगी आहे. आपण सर्व तिच्या ऋणात राहणे पसंद करतो. संपूर्ण श्रीमद् भगवद् गीता पठणासाठी आवर्जून आलेल्या आपणा सर्वांना खूप धन्यवाद

सर्व सेवाभावी स्वयंसेवकांच्या सहाय्यामुळे हा पठण सोहळा कार्यक्रम देखणा आणि सुश्राव्य झाला. यात ज्येष्ठ स्वयंसेवक शशिकांत मंत्री काका, अंबादास चन्ना काका, चंद्रकांत गोडबोले काका, श्री आशुतोष भावे, श्री अरविंद कुलकर्णी, आनंद पानसरे, दयाराम जोशी, अशोक कौलगुड, सतीश पाटील, नितीन फडणीस, संजीव पाटील, दत्ता कुलकर्णी, सौ मिनाताई देशमुख, सौ मिरा पाटील, सौ गौतमी कुलकर्णी सौ स्नेहल कुलकर्णी यांचा उत्साही सहभाग, सर्वांना प्रेरणादायी असतो. स्टेजवरील मुखोद्गत गीतापाठ करणा–या मा. आरतीताई कुलकर्णी, मीनाक्षी गायकवाड, गौरी ढुमके, सुरेखा बेंडे व शशिरेखा परांजपे यांच्या लयबध्द व सुस्पष्ट पठणासोबत सर्वांनीच या पठणाचा आनंद घेतला.




## स्वामी अय्यप्पा मंदिर सबरीमला



**ज्योतिर्मय साहित्य**

हे व्रत अंगीकारणाऱ्या व्यक्तीने स्वामीये शरणम अय्यप्पा या मंत्राचा जास्तीत जास्त जप करावयाचा असतो. व आपण पूर्णपणे स्वामी अय्यप्पाला शरण जात आहोत हा भाव मनावर बिंब वायचा असतो. या काळात मांसाहार, दारू, तंबाखू ,गुटखा, सिगारेट, कांदा, लसूण हे पूर्णपणे वर्ज करावयाचे असतात. त्याचबरोबर जास्त तिखट आणि मसालेदार अन्नाचे सेवनही वर्ज करावयाचे असते. या काळात काळी, निळी किंवा केशरी लुंगी आणि तशाच रंगाचा शर्ट, गळ्यात रुद्राक्ष किंवा तुळशीची माळा, असा वेश करावयाचा असतो. दररोज सकाळ ,संध्याकाळ दोन वेळेस स्नान करून अय्यप्पाचे पूजन मंत्र जप स्वामीये शरणम अय्यप्पा किंवा ओम हरिहर सुताय नमः या मंत्राचा जप करतात. समोरच्या व्यक्तीस स्वामी म्हणून संबोधन करावे. या या काळात राग, द्वेष शिवी देणे टाळावे .लोभ मत्सर ,मोह इत्यादी वर नियंत्रण ठेवणे व सात्विक नियंत्रित ब्रह्मचर्य पूर्वक जीवन जगावे हे अपेक्षित असते. व्रताच्या शेवटी सबरीमला कडे प्रयाण करायचे असते. जाण्यापूर्वी इरुमुडी कट्टू म्हणजे यात्रेची पोटली बांधून घ्यावी लागते या पोटलीत शुद्ध तूप पूजा साहित्य व गरजेच्या वस्तू असतात. ही पोटली डोक्यावर घेऊन मुखाने स्वामी शरणम अय्यापा चा घोश करीत सबरीमाला च्या मंदिराकडे लोक जातात. रस्त्यात घनदाट जंगल लागते. या जंगलातूनच पंपा नदी वाहते.

त्या नदीतही स्नान करून पुढे मार्गक्रमन करीत डोंगरावर मंदिरात जायचे असते. शबरी मला या मंदिरात जाण्यासाठी १८ पायऱ्या आहेत या १८ पायऱ्या पवित्र समजल्या जातात. व ज्यांनी व्रताचे पालन केले आहे व इरुमुडीकट्टू डोक्यावर घेतलेला आहे त्यांनाच इथून जाऊ देण्यात येते.या १८ पायऱ्या म्हणजे पंच इंद्रिय पंचकर्मेंद्रिये सहा विकार व मन बुद्धी यावर नियंत्रण करण्याच्या पायऱ्या आहेत. हे दुर्गुण कमी होऊन इंद्रियावर नियंत्रणे आल्यावर मगच प्रभुची भेट होते. हे जणू या पायऱ्याद्वारे दाखविले आहे. सबरीमला या मंदिरात दरवर्षी लाखो भाविक दर्शनात जातात.

महिलांना प्रवेश वर्ज

वय वर्षे दहा ते पन्नास या वयातील महिलांना या मंदिरात प्रवेश नाही. कारण अय्यप्पा स्वामी हे कडक ब्रह्मचारी आहेत. पण महिला घरी हे ४१ दिवसाचे व्रत करू शकतात.

माणसाच्या मनातील षड विकार कमीव्हावेत.साधे पण त्यागमय जीवन जगण्याची प्रेरणा त्यास मिळावी, तो पात्र व्हावा म्हणुन अशा व्रताची योजना झाली असावी.यातुनच प्रभु भक्ती त्यांचे मनात रूजते. ज्या व्यक्तीने सलग अठरा वेळेस हे व्रत केले आहे, त्याला गुरु स्वामी असे संबोधल्या जाते. असा व्यक्ती तो इतर भक्तांना हे व्रत पाळण्या बद्दल प्रेरित करतो. त्यांना या दिव्य वृत्ताचा संकल्प सोडविण्याचा अधिकारी होतो.

हरिहर पुत्र अय्यप्पाच्या विमल चरणावर विनम्रतेने प्रणाम करून हा भाग इथे संपवूयात


*स्वामी शरणम अयप्पा

# शेतकऱ्याचं वास्तव मांडणारी 'बारोमास'

**ज्योतिर्मय साहित्य**

शेतकरी कुटुंबात जन्म घेतल्याने शेती, पाऊस, दुष्काळ, अवकळी संकटांचा करावा लागणारा सामना आणि बाराही महीने अत्यंत बिकट जीवन जगणाऱ्या कुटुंबांच्या व्यथा, वेदना मला बालपणापासून परिचित होत्या. जेव्हा शिक्षणाच्या निमित्ताने शहर गाठवं लागलं तेव्हा तर शेतकरी कुटुंबातला मुलगा म्हणून येणाऱ्या अडचणीचा सामना करावा लागला होता. पण वाटायचं की, हे असे जगणे इतरानांही जगावे लागत असेलच ना... शाळेची पाच रु. परीक्षा फीस भरण्यासाठी माझ्या वडीलांना विहीर खोदकाम मंजूरीच्या पैशाची वाट पहावी लागायची... तेव्हा सुद्धा वाटायचं सगळ्याच शेतकऱ्यांचे हेच हाल आहेत. खूप मोठा काळ निघून गेला पण आजही शेतकऱ्यांच्या स्थितीत तसूभरही बदल झाला नाही. नुकतीच मला सदानंद देशमुख यांची 'बारोमास' कादंबरी मिळाली आणि मी ती झपटल्या सारखी वाचून काढली. अक्षरशः मला पुन्हा माझ्या बालपणात घेऊन गेली. मला अत्यंत भावलेली आणि अस्वस्थ करणाऱ्या बारोमासने मला त्यावर लिहण्यासाठी प्रवृत केले. मला माझ्या हृदयाच्या भावना व्यक्त करण्याचा मोह आवरता आला नाही.

सदानंद देशमुख यांच्या साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या बारोमास या कादंबरीत महाराष्ट्रातीलच नाही तर देशभरातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांचे वास्तव चित्रण केलेले आहे. शेतकरी जीवनाचे सर्वांगीण चित्रण करणारी कादंबरी म्हणजे बारोमास... कादंबरीचा नायक एकनाथ हा उच्च शिक्षित असूनही कुठे ओळख नसल्याने तसेच शिक्षण संस्थेला डोनेशन देण्याची आयपत नसल्यामुळे त्याला प्राध्यापक होता आले नाही. परंतु त्याचे उच्च शिक्षण आणि हुशारी बघून शहरातला नोकरदार त्याची सुंदर आणि शहरी मुलगी अलका खेड्यातील शेतकरी कुटुंबात सून म्हणून देतो. पण एकनाथला कुठेच कोणती नौकारी लागत नाही. पर्यायाने त्याला शेतातच काम करावे लागते. शेतीवर जिवापाड प्रेम करणाऱ्या आणि शेतीवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असणाऱ्या कुटुंबाची शोकांतिका मांडत असताना आजही शेती हा आतबट्टयाचाच धंदा असल्याचा प्रत्यय येतो. बारोमास ही केवळ एक कादंबरी नाही तर तो समस्त शेतकरी वर्गाची समूळ व्यथा, वेदना, वास्तव, कैफियत, शोकांतिका मांडणारा परिपूर्ण ग्रंथ आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.




लग्न होऊन नवीन स्वप्न उराशी घेऊन खेड्यात आलेली अलका आणि उच्च शिक्षित असूनही पारंपरिक शेती करणारा एकनाथ कधीच दोन सुखाचे क्षण अनुभवू शकत नाही. शेवट परिणाम असा होतो की दोघे संसारसुख तर सोडा पण सोबतही राहू शकत नाही. वाचकांची आगतिकता इतकी वाढते आणि त्यांना असं वाटायला लागते की, एकदाची एकनाथला नौकरी लागावी आणि एकनाथ–अलकाचा सुखाचा संसार सुरु होतो. पण सगळेच विपरीत घडते. शेती, मातीवर जिवापाड प्रेम करणारे वडील सुभानराव आणि रट्टे–घट्टे खात संकटाना तोंड देत परिस्थितीला सामोरी जाण्याचे धारिष्ट दाखवून संसाराचा गाडा ओढणारी गावखेड्यातील शेवंतामाय एकनाथची आडाणी आई कधी आगतिक होऊन कधी समजुतीने वागते खरी पण परिस्थितीने तिलाही हतबल करून सोडले... एकनाथचा भाऊ मधूने शिक्षण घेतले पण तोही नोकरीच्या प्रतिक्षेत आहे. आपलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी कधी जमिनीतल्या गुप्त धनाचा शोध घेतो. तर कधी गैरमार्गाने पैसे देऊन नौकरी मिळवण्याचा प्रयत्न करतो त्यात त्याची फसवणूक होते. मग शेवटी तोही नाईलाजाने चोरी करायला लागतो. एकनाथच्या बहिणीचा म्हणजे मंगलचा नवरा दुबार पेरणी आणि थकलेल्या कर्जाच्या विवंचनेतून आत्महत्या करतो. लहरी निसर्गाशी दोन हात करणारे पण सावकारा कडील गहान जमीन सोडवता न आल्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन मृत्यूला जवळ करणारे सुभानराव. सगळंच संपल्यावर उपाय म्हणून शेतकरी संघटनेच्या चळवळीत सहभागी झालेल्या कथानायक एकनाथला अटक होते आणि घरी एकटीच वाट पाहत राहिलेली शेवंतामाय शोक करत असते... चंद्री मांजरीची हालचाल, तिचे एकनाथशी असलेले भावनिक नाते, तिच्या विषयी नोंदवलेले सूक्ष्म निरीक्षण आणि तिचाही झालेला शेवट सगळेच मनाला चटका लावणारे आहे... वाचकाच्या डोक्यात अनेक प्रश्नाचे अनेक भुंगे सोडून देशमुख कादंबरीला विराम तर देतात पण कथानकाला आजही पूर्ण विराम देता येणार नाही.

बारोमास मधून ग्रामीण शेतकरी कुटुंबाच्या माध्यमातून दोन पिढ्या, शिक्षित–अशिक्षित यांच्यातील संघर्ष प्रतिबिंबित झालेला आहे. एक बाजूला पतहीन, चिंताग्रस्त झालेला शेतकरी तर दुसऱ्या बाजूला नफा कमवून लुटणारे व्यापारी, सावकार, भ्रष्ट राजकारणी, शेतकऱ्यांच्या जीवन संघर्षात फार म्हणावा तसा प्रभाव टाकू न शकलेल्या शेतकरी संघटना... यामुळे भरपूर शेती असणारा शेतकरी कधीही मनासारखं जगू शकत नाही. पण मुकुटराव सारखा शेतमजूर मात्र मस्त रोख मजुरी घेऊन किमान काही क्षण निवांत राहतो. हा विरोधाभास कादंबरीत सर्वत्र दिसतो कारण जो शेतकरी मजूर लावण्याची हिंमत करतो. त्याला मजुरी देण्याची तयारी ठेवतो पण स्वतःच्या घरी पाहुणे जरी आले तर साखर–पत्ती साठी दुकानात जावे लागते. इतकी त्याची बिकट आर्थिक स्थिती असते. आपण सगळे त्याला बळीराजा म्हणतो पण तोच आज दयनीय अवस्थेत जीवन जगतोय. पेरले तर पिकत नाही आणि पिकले तर विकत नाही. शिवाय अस्मानी–सुलतानी संकटे त्याची कधी पाठ सोडत नाही. सदानंद देशमुख यांनी आपल्या समग्र लिखाणातून हेच सांगण्याचा प्रयत्न केला की, आता तोकड्या उपचाराने शेतकाऱ्याची बारोमास चालणारी साडेसाती संपणार नाही तर त्यासाठी निर्णायक शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे.

सदरील (कादंबरी) ग्रंथ जन्मभर शेतात राबवून मेल्यावर आम्हाला वावरातच जाळा असं सांगून गेलेल्या आई बापास अर्पण करणारे सदानंद देशमुख हे एक अत्यंत प्रतिभावान आणि तितकेच संवेदनशील लेखक असून त्यांना गांव, शेती, शेतकरी त्यांच्या अर्थव्ययवस्थेची परिपूर्ण जाण आहे किंबहूना ते दु:ख स्वत: भोगून त्यावर भाष्य करणारे विचारवंत आहेत. त्यांची तहान,चारीमेरा ह्या कादंबरी सुद्धा शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या व्यक्त करतात. कादंबरी सारख्या एखाद्या साहित्यकृतीतून हृदय पिळवटून टाकणारे वास्तव मांडून त्यावर वाचक, सामाजिक चळवळी, शासन व्यवस्था इ. ना विचार करायला लावणारे वस्ताववादी कथानक यात रेखाटले आहे. यातून अत्यंत कटू सत्य मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. कादंबरीचा नायक एकनाथच्या कुटुंबाची झालेली परवड, शेती, नपिकी, दुष्काळ, दुबार पेरणी, शेत मालाला अत्यल्प भाव आणि बियाणे, खते, औषधी यांच्या वाढलेल्या किमिती इ. समस्या शेतकऱ्याना बाराही महीने छळत असतात. त्याच्या आयुष्याची धूळधाण करतात... जगणे अत्यंत कठीण करतात..हे सगळे घडते वर्षोनवर्ष कायम असणाऱ्या शेतीवरील संकटामुळे. एकूणच ग्रामीण, कृषी अर्थशास्त्रातल्या अनेक समस्या,संघर्षाचे दर्शन बारोमास मध्ये होते. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांच जीवन अत्यंत बेभरवशी झाले. तरीही यातूनच सकारात्मक काही चांगले घडू शकण्याची शक्यता आहे. कृषीप्रधान असलेल्या आपल्या भारत देशाच्या शेतकर्यांना किमान यापुढे तरी चांगले दिवस येतील. आपण सर्वांनी यासाठी काय करता येइल याचा विचार करावा म्हणजे यापुढे भविष्यात तरी कुठली अलका एकनाथला सोडून जाणार नाही..तसेच बारोमास असणाऱ्या संकटापासून त्यांची कायमची सुटका व्हावी हीच विधात्यास हृदयापासून प्रार्थना आहे...


पुस्तक परीक्षण
रमेश काकासाहेब शिंदे
छत्रपती संभाजीनगर
मो.९४२२२९७०८९६

## कवी सुनील उबाळे यांच्या उलटया कडीचं घरला मातोश्री हरणाबाई जाधव काव्य पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर–** येथील कवी सुनील उबाळे यांच्या उलट्या कडीचं घर या काव्यसंग्रहाला मातोश्री हरणाबाई जाधव काव्य पुरस्कार जाहीर झालाय. येत्या २१ डिसेंबर रोजी त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.



छत्रपती संभाजीनगरमध्ये झेप साहित्य संमेलन होत आहे. या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते कवी सुनील उबाळे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये २१ डिसेंबर रोजी साप्ताहित झेप तर्फे आयोजित २० वे झेप साहित्य संमेलन होत आहे. महात्मा गांधी भवन येथे हे संमेलन होईल. या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते कवी सुनील उबाळे यांचा गौरव करण्यात येणार आहे, असे साप्ताहिक झेपचे संपादक डिंगाबर जाधव यांनी कळवले आहे. या पुरस्काराबद्दल सुनील उबाळे यांचे अभिनंदन होत आहे.

जगण्याच्या मुळाशी असलेली आदिम भूक हे सुनील उबाळे यांच्या कवितेचे सर्जनकेंद्र आहे. ही कविता प्रचंड संवेदनशील आहे. कामगार वर्गाचं एक अतिशय वेगळं जगणं ती आपल्यासमोर उभं करते. हे सारं करताना कवी आक्रस्ताळा होत नाही. तो करुणेचं बोट धरून वाटचाल करतो. सुनील उबाळे यांचा उलट्या कडीचं घर या काव्यसंग्रहाला अनेक पुरस्कार मिळालेत.












# ‘‘ग्रेटभेट’’ – उत्तुंग व्यक्तिमत्त्व– पद्मश्री उदय देशपांडे

**ज्योतिर्मय साहित्य**

तितीक्षा इंटरनॅशनल -पुणे,या संस्थेने आयोजित केलेल्या ०७-१२-२०२५च्या ‘‘ दशकपूर्ती कलासाहित्य संमेलनात -आभासी विश्वातील साहित्यिकांची समक्ष भेट,परिचय - संवादभेट‘‘ हे सुखद-क्षण अनुभवता आले.

तितीक्षा संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षा-

प्रिया प्रमोद दामले यांनी संमेलनाच्या व्यासपीठावर अतिथी म्हणून विविध क्षेत्रातील नामवन्त, मान्यवर व्यक्तिमत्वांना पाचारण केले होते.

या मान्यवरांच्या बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांना झाला.

या व्यासपीठावर एकाचवेळी दोन ‘‘पद्मश्री ‘‘ आसनस्थ झाले होते.यातील एक होते -पद्मश्री -गिरीशजी प्रभुणे , आणि दुसरे होते-पद्मश्री उदयजी देशपांडे.

भोजन -अवकाश सुरू असताना उदय

देशपांडेसरांशी काही वेळ बोलण्याचा

योग आला.

मल्लखांब ‘‘या अस्सल भारतीय क्रीडा प्रकारास केवळ भारतातच नव्हे तर

साऱ्या विश्वात ‘‘लोकप्रियता आणि मान्यता ‘‘मिळवून देणाऱ्या कार्याची,तसे

या क्रीडा प्रकारचा प्रचार-प्रसार कार्याची

**अरुण वि.देशपांडे-पुणे**
**९८५०१७७३४२**

दखल भारत सरकारने घेतली .

या कार्याबद्दल जाने-२०२५ मध्ये ‘‘पद्मश्री ‘‘या नागरी सन्मानाने उदयजी देशपांडे यांना सन्मानित केले आहे.

मुंबईच्या दादरला शिवाजी पार्क मध्ये

असलेली ‘‘ समर्थ व्यायाम शाळा ‘‘

हे उदयजी यांचे कार्यक्षेत्र आहे.

इथूनच त्यांचे कार्य भारतात विस्तारले,

आणि या सीमा ओलांडून मल्लखांब

हा भारतीय क्रीडा प्रकार विदेशातील अनेक देशात लोकप्रिय ठरतो आहे.

याचे श्रेय आंतरराष्ट्रीय मल्लखांब प्रशिक्षक अशी ओळख असलेल्या पद्मश्री उदय देशपांडे यांना दिले जाते.

पोल(खांब) , रोप (दोरी) या दोन्ही प्रकारच्या मल्लखांब खेळाचे प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण देणारी शिबीरे‘‘ यात हे तळमळीचे प्रशिक्षक सदैव व्यस्त



असतात.

प्रशिक्षण शिबीर आयोजकांना उदय सर

सदैव प्रतिसाद देत असतात.

उदयसरांशी झालेल्या या भेटीला माझ्या दृष्टीने एक वेगळा स्नेह-धागा आहे, तो असा:

अखिल भारतीय मल्लखांब संघटनेचा हैद्राबादचा एक जेष्ठ प्रशिक्षक, कार्यकर्ता, पदाधिकारी असा उल्लेख करताच उदय सर चटकन म्हणाले -

ते दिलीप गव्हाणे , आम्ही या मल्लखांब क्रीडाक्षेत्रात ‘‘ प्रचार-प्रसार कार्यकर्ते आहोत.

उदयसरांनी अगदी आपलेपणाने सांगितले. त्यांच्या मनाचा हा मोकळेपणा, मोठेपणा मला फार सुखावून गेला.

त्याक्षणी पद्मश्री उदय देशपांडे या उत्तुंग व्यक्तिमत्वाला मी मनोमन वंदन केले.

मित्रांनो-

भारतीय मल्लखांब क्षेत्रातले एक मोठे व्यक्तिमत्त्व‘‘हैद्राबाद निवासी श्री दिलीप

गव्हाणे हे माझे शाळकरी मित्र आहेत.

१९६५-६७ या काळात हैद्राबादच्या

गव्हरमेंट हायस्कुल -काचीगुडाचे आम्ही एचएससीचे क्लासमेट आहोत.

साठ वर्षांपासूनची आमची मैत्री आजही तितकीच टवटवीत आणि ताजी आहे.

या मित्राला फोन करून उदयजी देशपांडे सरांच्या भेटीबद्दल सांगितले-

मी त्यांना नुसते हैद्राबाद म्हटले की सरांनी तुझे नाव घेतले, तेंव्हा खूप आनंद झाला.

माझे शब्द ऐकून दिलीप गव्हाणे तत्काळ

म्हणाले ‘‘ उदयसर म्हणजे अगदी डाऊन टू अर्थ माणूस.!

मित्र हो -माझ्या मित्राचा मित्र असलेले पद्मश्री उदयजी देशपांडेसर आता आपोआपच माझे ही मित्र झाले की .

या भेटीचे श्रेय तितीक्षा आणि प्रियाजी दामले यांना दिले पाहिजे.

***

# पुतीन भेटीची ठोसफलीते

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

औषधी उत्पादने सागरी खाद्यपदार्थ उत्पादने यांना रशियात मोठी संधी प्राप्त होणार आहे, तसेच नव्या पासपोर्ट सुविधानमुळे भारतामधील अनेक पर्यटन स्थळे व कला केंद्राना रशियन लोकं मोठ्या संख्येने भेट देतील तेंव्हा सांस्कृतिक संबंध अधिक भक्कम होतील.

वृद्धीसाठी उपयुक्त प्रयत्न प्रगत मनुष्यबळ अशा याबाबतीत सुद्धा निश्चितपणे फायदा होणार आहे. भारतातील सुशिक्षित तरुणांना रशियात नव्या रोजगार संधी त्यामुळे उपलब्ध होतील. आणि उद्योजकता विकासासाठी नव्या क्षेत्रांचा शोध घेणे शक्य होईल आर्थिक व्यापार क्षेत्रातील ही संधी म्हणजे एक नवी सुवर्णसंधी आहे. भारतीय व्यापारी उद्योजक याबाबतीत किती रस घेतात या संधीचे कसे सोने करतात यावरच या व्यापार बुद्धीचे भविष्य अवलंबून असणार आहे.

मौलिक संयुक्त निवेदन

संरक्षण व लष्करी करार हा या शिखर बैठकीचा आधार होय त्यामुळे भारताला ५०० जातीची प्रगत क्षेपणांस्त्रे मिळणार आहेत. त्यामुळे शेजारी शत्रू राष्ट्राशी समर्थपणे लढणे शक्य होईल.

पुतीन यांच्या भेटीनंतर भारत सरकारच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात उभय राष्ट्रातील भागीदारी अधिक सक्रिय आणि गतिमान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेषतः भारत रशिया यांच्यात स्थापन झालेल्या संयुक्त व्यापार मंचाचा हा २५ वा वर्धापन दिवस होता, यानिमित्ताने करण्यात आलेले संकल्प उभय देशातील मैत्रीची दिशा उजळ करणाऱ्या आहेत. आणि नव्या क्षितिजांचा शोध घेणारे आहेत नेत्यांनी दीर्घकालीन आणि काळाच्या कसोटीवर उतरलेल्या संबंधांचा विशेष संदर्भात विकास करण्यावर भर दिला आहे. राष्ट्रीय हितसंबंधांच्या क्षितिजांच्या कक्षा रुंदावत आहेत. परस्पर आदर आणि धोरणात्मक अभिसरणाने वैशिष्ट्यपूर्ण अशी संबंधांची वेळ विकसित होत आहे सामायिक जबाबदाऱ्यांवर भर देऊन प्रमुख शक्ती स्त्रोत्रांचा विकास केला जात आहे. उभय देशातील दृढ असे नाते जागतिक राजकारणाच्या संदर्भात शांतता आणि स्थैर्य यांचे आधारस्तंभ बनले आहेत. ते समान आणि अविभाज्य सुरक्षेचा आधार बनले आहेत. आणि उभय राष्ट्रांनी सुनिश्चित केलेली तत्त्वे आणि प्रणाली ही



अधिक तेजस्वी होत आहेत. राजकीय आणि धोरणात्मक तसेच लष्करी आणि सुरक्षाविषयक व्यापार आणि गुंतवणूक विषयक ऊर्जा विकास आणि तंत्रज्ञान अणुऊर्जा अंतराळ संशोधन सांस्कृतिक आदान प्रदान शिक्षण आणि मानवतावादी क्षेत्रातील सहकार्य यासह सहकार्याच्या विविध क्षेत्रात वयराष्ट्रे बहु आयामी परस्पर पूरक फायदेशीर क्षितिजा क्षेत्रांचा विकास करत आहेत. देशातील संबंधांच्या सकारात्मक मूल्यांकनाचा आलेख सदैव उंचावत आहे पारंपरिक संबंधांना काळानुरूप नवा अर्थ देण्याचा प्रयत्न




करण्यात येत आहे

समारोप


या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की सध्याच्या गुंतागुंतीच्या आव्हानात्मक आणि अनिश्चित भूराज नैतिक परिस्थितीमध्ये उभय देशांचे संबंध मजबूत राहिले आहेत. दोन्ही बाजूंनी समकालीन संदर्भात संतुलित परस्पर फायदेशीर आणि तेवढीच सक्रिय शाश्वत दीर्घकालीन भागीदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

संपूर्ण परिदृश्यामध्ये भारत रशिया यांच्यातील संबंधांचा विकास हा सामायिक पूरक परराष्ट्र धोरणांच्या प्राधान्यक्रमाचा विकास आहे. धोरणात्मक भागीदारी सक्रिय करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्याचे मान्य करण्यात आले आहे. ही सर्वात मोठी जमेची बाजू आहे भारताच्या वतीने रशियामध्ये कयानबर्ग तसेच कझान येथे वाणिज्य दूतावास स्थापन केले आहेत. त्यामुळे आता आर्थिक व व्यापारी संबंधांना नवी गती लाभत आहे. मागील शिखर परिषदे पासून सर्व समस्यावर मात करण्यासाठी संपर्क वाढवण्यावर भर देण्यात आला, त्या दृष्टीने दोन्ही देशाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी चर्चा करून व्यापार आर्थिक वैज्ञानिक तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला. आता प्रसारमाध्यम शिक्षण पर्यटन तसेच क्रीडा यासारख्या बहुआयामी क्षेत्रात सुद्धा संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला आहे. व्यापार ऊर्जा वाहतूक संवाद कनेक्टिव्हिटी तसेच सुधीर पूर्वेकडील संबंधांची नवी रचना त्याशिवाय अणुऊर्जा सहकार्य अंतराळ संशोधन सहकार्य आणि लष्करी आणि तांत्रिक सहकार्य तसेच संरक्षण क्षेत्रातील सामुदायिक उत्पादन प्रकल्प आणि विज्ञान तंत्रज्ञानामधील सहकार्य ही सर्व नवी क्षेत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत १९७० पासून चालू असलेल्या सांस्कृतिक सहकार्याला पर्यटन विकासाला आणि लोकसंपर्क आता अधिक गती देण्याचा संकल्प करण्यात आला आहे त्यामुळे भारतातील तरुण वर्गाला रशियामध्ये शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध होत आहे संयुक्त राष्ट्र आणि बहुपक्षीय मंचामध्ये परस्पर सहकार्य करून जगात शांतता स्थैर्य व विकास तसेच दहशतवादाशी समान मुकाबला या सर्व तत्वांचा पुन्हा एकदा उद्घोष करण्यात आला आहे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या संयुक्त घोषणा पत्रात एकूण ७० मुद्दे असून त्यामध्ये प्रादेशिक सहकार्य तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील परस्पर हिताच्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करण्यात आला आहे त्यामुळे दोन्ही देश लोकशाही मानवी कल्याण आणि जागतिक शांतता व स्थैर्याच्या दृष्टीने दमदार पावले टाकण्यास पुढे वाटचाल करत आहेत अशा प्रकारे पुतीन यांचा हा भारत दौरा म्हणजे उभय राष्ट्रातील ऐतिहासिक मैत्रीला अधिक सोनेरी उजाळा देण्याचा आणखी एक प्रयत्न म्हटला पाहिजे त्यामुळे भारताला विकसित राष्ट्र होण्यासाठी एक विश्वासू मित्र कायमस्वरूपात लावला आहे आणि २०४७ मध्ये विकसित राष्ट्र होत असताना भारताच्या पाठीशी रशिया खंबीरपणे उभा राहील यात शंका नाही.

***

# उत्कट भव्य तेचि घ्यावे ।

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**



सागर आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगत होता कि ‘‘माझ्या जीवनाला खरा आधार या शाळेने दिला. असे शिक्षण बाहेर घ्यायचे झाले तर लाखो रुपयांची फी भरावी लागते. तुम्ही अभ्यासाबरोबर वाचन, चिंतन आणि मननाची जोड देऊन आपला अभ्यास परिपक्व करा. अवांतर वाचन करा तसेच खेळ, संगीत, चित्रकला, वर्क्तुत्व, नृत्य, लेखनकौशल्य याचा अंगीकार करा.‘‘

आम्ही शक्यतो शाळांमध्ये माजी विद्यार्थ्यांना बोलवितो. विद्यार्थी माजी विद्यार्थ्यांचे भाषण मनपूर्वक ऐकतात आणि स्फूर्ती घेतात. त्यांना असे जाणवते कि, मीपण असे बनू शकतो.सागर शिंदे मनोगतात सांगत होता....

चिटणीस साहेब माझ्या आयुष्यातले सर्वात मोठे मोटीव्हेशनल आहेत असे मी म्हणू शकतो. मोटीव्हेशनल स्पीकर म्हणजे काय असतं हे मला त्यांच्याकडून कळालं. ते वारंवार शाळेत यायचे, सर्व वर्ग असेच एकत्र जमवायचे. खूप नवनवीन गोष्टी सांगायचे. खूप गोष्टी त्यांच्याकडून शिकल्या. त्यांचे भाषण ऐकल्यानंतर फुगा फ ुगायचा. असं वाटायचं कि, आयुष्यात मी काहीही करू शकतो अशी भावना निर्माण व्हायची. नंतर फुग्यातली हवा कमी व्हायची, पण नंतर परत ते आल्यावर तो फुगा परत फ


**शिरीष चिटणीस**
**सातारा मो. 75888 65051**

ुगायचा आणि आमच्यात ते चैतन्य निर्माण करून ध्येयाची आठवण करून द्यायचे. या शाळेने तुम्हाला अगदी घराच्या जवळ अर्धाकिलोमीटर अंतरावर जी संधी निर्माण करून दिली आहे त्याचा पुरेपुर फायदा करून घ्या आणि आकाशाला गवसणी घाला.

मी जेंव्हा सागरचे भाषण-मनोगत ऐकले तेव्हा माझ्या मनात आनंदझरा निर्माण झाला आणि पैशापेक्षा सामाजिक कार्याला असणारे महत्व अधोरेखित झाले. खेडोपाडी चालू असलेल्या मराठी शाळा टिकविण्याची समाजाची-शिक्षकांची-पालकांची आणि माजी विद्यार्थ्यांची जबाबदारी किती महत्वाची आहे हे अशा प्रसंगातून आपणाला जाणवते.

# गुलाबी थंडीचा नजारा

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

मला तर इथलीही थंडी सहन होत नाही. शरद ऋतूतील गारवा, त्या गारव्यातील सुंदर चांदणे, पौर्णिमेचा चंद्र, ते शीतल चांदणे, अशा वातावरणात थंडगार हवेचा आस्वाद घ्यायला तरुणाईला फार आवडते. पर्यटक मुद्दाम सहली आयोजित करतात. शाळा कॉलेजात हिवाळी सहली निघतात. त्यावेळी आठवते अगदी डोक्यापासून पायापर्यंत संरक्षक कवच घातल्यासारखा जामानिमा असायचा. शाळेत शिक्षक असतांना शाळेच्या हिवाळी सहली, स्नेहसंमेलने, सायन्स एक्झिबिशन, क्रीडा महोत्सव हे दरवर्षी असायचे. मुलांना या गोष्टीत खूप उत्साह असायचा.

निसर्ग सौंदर्याचा तर आविष्कारच वेगळा, तो धुक्यात हरवलेला आगळा नजारा दिसायचा. गुलाबी थंडीत, धुक्याची शाल पांघरलेले डोंगर, तो आसमंत असा धुंदिवलेला, फळाफुलांनी बहरलेली वसुंधरा, तिच्यावर ही धुक्याची शाल पांघरलेली, प्राची च्या रम्य वेळी अंधुकसा राखाडी धुक्याचा पडदा सारुन हळूच कधी कधी उन्हाचे कवडसे स्वतःची वाट शोधायचे. अंधुक प्रकाशात धडपडणारा प्रवास. गारठलेला जीव मुठीत घेऊन केलेल्या त्या सहली आठवल्या की, अजुनही शहारे येतात. माझ्या मुलींनी त्या वैष्णवी देवीला गेलेल्या सहलीचे वर्णन ऐकतांना तर मी जागीच गोठू लागते की काय असे वाटले.

मी पाहिलेल्या पूर्वीच्या चित्रपटात थंडीतल्या गाण्यांची ती दृश्ये, ती निसर्ग रम्य दृश्ये फारच विलोभनीय वाटायची. बर्फाळलेली घरे डोंगरशिखरे

त्या फळाफुलांनी बहरलेल्या बागा सारेच विलोभनीय वाटायचे. माझी आत्या तिच्या मैत्रिणीबरोबर मला कधीकधी सिनेमाला घेऊन जायची, त्यावेळी तेवढेच कधीतरी करमणुकीचे साधन असायचे. आता जवळजवळ पसतीस वर्षे तरी थिएटरमध्ये सिनेमा पाहिलेला आठवत नाही.



टीव्ही चे माध्यम घरात असल्याने, नोकरी, क्लास, संसार, रहाट गाडग्यात अडकल्याने आठवण नाही, पण टीव्हीवर निसर्ग दृश्ये पहाताना खूप सुंदर प्रसन्न वाटते.

हिवाळ्यात संत्री, मोसंबी, आवळा, पेरु, चिकू, सफरचंद, स्ट्रॉबेरी, बेरीफळे, डाळिंब, सीताफळे यांचा हंगाम असतो. तसेच फुले रंगीबेरंगी गुलाब, वेगवेगळ्या रंगाच्या शेवंती, ऑस्टर, झेंडू, मखमली कोंबड्याची फुले, अबोली, जास्वंदी, हेलेबोर, स्नोड्राप्स, कॅमेलिया तसेच फळभाज्या, पालेभाज्या, शेंग भाज्या यांची भरभराट असते.


स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

खूप सुंदर नैसर्गिक स्रोत असतो. संक्रांतीच्या हळदी कुंकवाच्या वेळी मी भरपूर फळे, फुले, भाज्या आणून रांगोळी, आणि फ्रुट, फ्लॉवर, व्हेजीटेबल यांचे डेकोरेशन करायची, तीळगूळाचे लाडू, चिकी घरीच बनवायची. आणि माहेरी मस्त थंडीच्या दिवसात वाड्यात उकडहंडी पोपटी बनवायचो.

एकदा शाकाहारी पालापाचोळा, काटक्या एक मोठा खड्डा खणायचा, मोठ्या मडक्यात वालपापडी, हरभरे, मटार, भुईमुग शेंगा, रताळी, बटाटे ओल्या हळदीचे दोन चार तुकडे. नारळाचेतुकडे, ओवा, मीठ मिरच्या, कांदे, मडके केळीच्या पानाने बंद करुनी उलटे ठेवून दिवसभर शेकत ठेवायचे.

तसेच रविवारी नॉनव्हेज चिकन, मटन, कोळंबी, अंडी वगैरे. हिवाळी अधिवेशन असे रंगते.

बहरण्याआधी होते पानगळ
झाड आपले जीर्ण वस्त्र बदलून
येते कोवळी नवी पालवी लेऊन

थंडीच्या दिवसातले कुडकुडणारे, बोचरे क्षण पण जेव्हा निसर्ग सौंदर्याने बहरतात तेव्हा खूप हवेसे वाटतात. असो. लेख वाढत चालला, थंडी संपून उन्हाळा येईल म्हणून आवरते घेते. थंडी ही वाढत चालली आहे.

कोंबड्यांनी बांग द्यायला सुरुवात केली आहे.
सर्वांना हिवाळी शुभेच्छा.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559